ासी हाणूं मारूं ॥ नव्हे बुझावितां स्थिरू । कांहीं करिना हा ॥ त्वांचि केलें
ऱ्कें ठायीं । आतां निवडूनी खाई ॥ आह्मां जाचितोसी कांई । हरिसी ह्मणे
ाता ॥ ३ ॥ साचें लयाकुल । करवितां तुटे भान ॥ तंव झालें समाधान । उठो-
नियां बैसे ॥ माते बरें जाणविलें । अंग चोरूनी आपुलें ॥ तोडियेलें एका बोलें ।
कसें सुखदुःख ॥ ४ ॥ ताट पालयें झांकिलें । होतें तैसें तेथें केलें ॥ भिन्नाभिन्न
निवडिलें । अन्नें वेगळालीं ॥ विस्मित जननी । भाव देखोनियां मनीं ॥
ह्मणे नाहीं ऐसा कोणी । तुज सारिखा रे ॥ ५ ॥ हरुषली माये । सुखअंगीं
न समाये ॥ कवळूनी बाहे । देती आलिंगन ॥ आनंद भोजनीं । तेथें फिट-
लीसे धणी ॥ तुका ह्मणे कोणी । सांडा शेष मज ॥ ६ ॥

॥ ६७२८ ॥ चला वळूं गाई । बैसों जेऊं एके ठायीं ॥ १ ॥ वहू केली
वणवण । पायपिटी झाला सिण ॥ २ ॥ खांदीं भार पोटीं भूक । काय खेळा-
याचें सुख ॥ ३ ॥ तुका ह्मणे धांवे । मग अवघें बरवें ॥ ४ ॥

॥ ६८२९ ॥ नेणों वेळा काळ । घालों तुझ्यानें सकळ ॥ १ ॥ नाहीं नाहीं
रे कान्होबा भय आह्मांपाशीं । वळूनी पुरविसी गाई पोटा खावया ॥ २ ॥
तुजपाशीं भयें । हें तों बोलों परी नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोल । आह्मां
अनुभव फोल ॥ ४ ॥

## विटूदांडू. अंभग.

॥ ६८३० ॥ सारा विटूदांडू । आणीक कांहीं खेळ मांडूं ॥ १ ॥ बहु
अंगा आले डाव । स्थिर नाहीं कोठें पाव ॥ २ ॥ कोली हाणे टोला । झे-
ली तेणें तो गोविला ॥ ३ ॥ एकमेका हाक मारी । सेल जाळी एक धरी
॥ ४ ॥ राजी आलें नांव । फेरा न चुकेचि धांव ॥ ५ ॥ पुढें एक पाटी ।
एक ऐकें दोघे आटी ॥ ६ ॥ एका सोसा पोटीं । एक धांवे हात पिटी
॥ ७ ॥ तुका ह्मणे आतां । खेळ मोडावा परता ॥ ८ ॥

॥ ६८३१ ॥ पाहतां गोवळी । खाय त्याची उष्टावळी ॥ १ ॥ करि-
ती नामाचें चिंतन । गडी कान्होबाचें ध्यान ॥ २ ॥ आली धावी डाई ।
धांवे वळल्या मागें गाई ॥ ३ ॥ एके ठायीं काला । तुका ह्मणे भावि-
काला ॥ ४ ॥

॥ ६८३२ ॥ ते काय पवाडे नाहीं म्यां ऐकिले । गोपाळ रक्षिले वनांतरीं ॥ १ ॥ मोवचा वोणवा होऊनी राक्षस । लागला वनास चहुंकडे ॥ २ ॥ गगनासी ज्वाळा लागती तुंबळ । गोधनें गोपाळ वेडावलीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे तेथें पळावया वाट । नाहींच निपट ऐसें झालें ॥ ४ ॥

॥ ६८३३ ॥ धडकला अग्नि आह्मा येती वरी । गोपाळ श्रीहरी विनविती ॥ १ ॥ अरे कृष्णा काय विचार करावा । आलारे वोणवा जळो आतां ॥ २ ॥ अरे कृष्णा तुझें नाम बळिवंत । होय कृपावंत राख आतां ॥ ३ ॥ तुका ह्मणे अरे कृष्णा नारायणा । गोपाळ करुणा भाकितिले ॥ ४ ॥

॥ ६८३४ ॥ अरे कृष्णा आह्मी तुझे निज गडी । नवनीत आवडी देत होतों ॥ १ ॥ अरे कृष्णा आतां राखें कैसे तरी । संकटाभीतरीं पडियेलों ॥ २ ॥ वरुषला इंद्र जेव्हां शिळाधारीं । गोवर्धन गिरी उचलिला ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुझे पवाडे गोपाळ । वर्णिती सकळ नारायणा ॥ ४ ॥

॥ ६८३५ ॥ अरे कृष्णा तुवां कालिया नाथिला । दाढे रगडिला रिठासुर ॥ १ ॥ अरे कृष्णा तुवां पुतना शोषिली । दुर्बुद्धि कळली अंतरींची ॥ २ ॥ गोपाळ करुणा ऐसी नानापरी । भाकिती श्रीहरी तुजपुढें ॥ ३ ॥ तुझें नाम कामधेनु करुणेची । तुका ह्मणे त्यांची आली कृपा ॥ ४ ॥

॥ ६८३६ ॥ चहूंकडूनियां येती ते कल्लोळ । सभोंवते ज्वाळ जवळीं आले ॥ १ ॥ सकुमार मूर्ति श्रीकृष्ण धाकुटी । घोंगडी आणि काठी खांद्यावरी ॥ २ ॥ लहान लेंकरूं होतें तें सगुण । विक्राळ वदन पसरिलें ॥ ३ ॥ चाभाड तें एक गगनीं लागलें । एक तें ठेविलें भूमीवरी ॥ ४ ॥ तये वेळीं अवघे गोपाळही भ्याले । तुकेंही लपालें भेऊनियां ॥ ५ ॥

॥ ६८३६ ॥ श्रीमुख वोणवा गिळीत चालिलें । भ्यासुर वासिलें वदनांबुज ॥ १ ॥ विक्राळ त्या दाढा भ्यानें पाहावेना । धाऊनी रसना ज्वाळ गिळी ॥ २ ॥ जिव्हा लांब धांवे गोळा करी ज्वाळ । मोठें मुखकमळ त्यांत घाली ॥ ३ ॥ तुका ह्मणे अवघा वोणवा गिळीला । आनंद जाहाला गोपाळांसी ॥ ४ ॥

॥ ६८३८ ॥ गोपाळ प्रीतीनें कसे विनविती । विक्राळ श्रीपति होऊं नको ॥ १ ॥ नको रे बा कृष्णा धरूं ऐसें रूप । आह्मां चळकांप सुटलासे ॥ ५ ॥ होईं बा धाकुटा श्याम चतुर्भुज । बैसोनियां गुज सुखें बोलों ॥ ३ ॥ वोणव्याच्या संगें गिळिशील आह्मां । तुका मेघश्यामा पायां लागे ॥ ४ ॥

॥ ६८३९ ॥ सांडियेलें रूप विक्राळ भयासुर । झालें सकुमार कोडिसवाणें ॥ १ ॥ श्याम चतुर्भुज मुकुट कुंडलें । सुंदर दंडलें नव बाळ ॥ २ ॥ गोपाळ ह्मणती कैसें रे बा कृष्णा । रूप नारायणा धरियेलें ॥ ३ ॥ कैसा वाढलासी विक्राळ झालासी । गटगटा ज्वाळांसी गिळियेलें ॥ ४ ॥ तुका ह्मणे भावें पुसती गोपाळ । अनाथवत्सल ह्मणोनियां ॥ ५ ॥

॥ ६८४० ॥ बा रे कृष्णा तुझें मुख कीं कोमळ । कैसें येवढे ज्वाळ ग्रासियेले ॥ १ ॥ बा रे कृष्णा तुझी जिव्हा कीं कोवळी । होईल पोळली नारायणा ॥ २ ॥ बैसें कृष्णा तुझें पाहुं मुखकमळ । असेल पोळलें कोणी ठायीं ॥ ३ ॥ घोंगडिया खालीं घालूनियां तळीं । वरी वनमाळी बैसविती ॥ ४ ॥ तुका ह्मणे भावें आकळिला देव । कृपासिंधुराव त्रैलोक्याचा ॥ ५ ॥

॥ ६८४१ ॥ एक ह्मणती मुख वासीं नारायणा । पाहों दे वदना डोळे भरी ॥ १ ॥ वासुनियां मुख पाहाती सकळ । अवघे गोपाळ व्योमाकार ॥ २ ॥ ह्मणती गोपाळ वेडे हो हा देव । स्वरूपाचा ठाव न कळे याच्या ॥ ३ ॥ तुका ह्मणे अवघे विठोबा भोंवतें । मिळाले नेणते लहाथोर ॥ ४ ॥

॥ ६८४२ ॥ एक ह्मणती कृष्णा वासिलें त्वां मुख । तेव्हां थोर धाक पडिला आह्मां ॥ १ ॥ गिळों लागलासी अग्नीचे कल्लोळ । आम्ही चळचळां कांपतसों ॥ २ ॥ ज्वाळांबरोबरी गिळशील आम्हां । ऐसें मेघश्यामा भय वाटे ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसे भाग्याचे गोपाळ । फुटकें कपाळ आमुचेंचि ॥ ४ ॥

॥ ६८४३ ॥ गोपाळांचें कैसें केलें समाधान । देऊनि आलिंगन निवविलें ॥ १ ॥ ज्वाळाबरोबरी तुम्हां कां ग्रासीन । अवतार घेणें तुह्मांसाटीं ॥ २ ॥ निर्गुण निर्भय मी सर्वांनिराळा । प्रकृति वेगळा गुणातीत ॥ ३ ॥ चिन्मय चिद्रूप अवघें चिदाकार । तुका ह्मणे पार नेणे ब्रह्मा ॥ ४ ॥

॥ ६८४४ ॥ पैल आली आगी कान्हो काय रे करावें । न कळे तें कैसें आजी वांचों आम्ही जीवें ॥ १ ॥ धांव रे हरी सांपडलों संधी । वोणव्याचे मधीं बुद्धि कांहीं करावी ॥ २ ॥ अवचितां जाळ येतां देखियेला वरी । परतोनी पाहतां आधीं होतों पाठमोरी ॥ ३ ॥ सभोंवता फेर रीग न पुरे पळतां । तुका ह्मणे जाणसी तें करावें अनंता ॥ ४ ॥

॥ ६८४५ ॥ भिऊं नका बोले झांकूनियां राहा डोळे । चालवील देव धाक नाहीं येणें वेळे ॥ १ ॥ बाप रे हा देवाचाही देव । कळों नेदी माव काय करी करवी ते ॥ २ ॥ पसरूनी मुख विश्वरूप खाय जाळ । सारूनियां संधि अवघे पाहाती गोपाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे आम्ही मागें भ्यालों वांयांविण । कळों आलें आतां या सांगातें नाहीं शिण ॥ ४ ॥

॥ ६८४६ ॥ नेणती तयांसी साच भाव दावी हरी । लाज नाहीं नाचे पांवा वाजवी मोहरी ॥ १ ॥ चला रे याच्या पायां लागों आतां । राखिलें जळतां महा आगीपासूनी ॥ २ ॥ कैसी रे कान्होबा एवढी गिळियेली आगी । न देखों पोळला तुज तोंडीं कोठें अंगीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मी कां रे करितां नवल । आमची सिदोरी खातो याचें आलें बळ ॥ ४ ॥

॥ ६८४७ ॥ सांनीं धणीवरी संग केला हरीसवें । देऊनी आपुलें तोचि देईल तें खावें ॥ १ ॥ न ठेवी आभार प्रेमाचा भुकेला । बहु दिवस संग हाचि निर्धार त्याला ॥ २ ॥ कान्होबा तूं जेवीं घासोवासीं म्हणती । आरुष गोपाळें त्यांची बहु देवा प्रीति ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां जाऊं आपुलिया घरा । तोय वांचविलें ऐसें सांगों रे दातारा ॥ ४ ॥

॥ ६८४८ ॥ घ्या रे भोंकरें भाकरी । दहींभाताची सिदोरी ॥ ताक सांडीं दुरी । असेल तें तयापें ॥ १ ॥ येथें द्यावें तैसें घ्यावें । थोडें परि निरें व्हावें ॥ सांगतों हें ठावें । असों द्या रे सकळां ॥ २ ॥ माझें आहे तैसें पाहे । नाहीं तरी घरा जाये ॥ चोरोनियां माये । नवनीत आणावें ॥ ३ ॥ तुका म्हणे बरीं । माझें कोणी नाहीं हरी ॥ नका करूं दुरी । मज पायां वेगळें ॥ ४ ॥

॥ ६८४९ ॥ काल्याचिये आसे । देव जळीं झाले मासे ॥ पुसोनियां हांसे । टिरीसांगातें हात ॥ १ ॥ लाजे त्यासी वांटा नाहीं । जाणें अंतरींचें तें ही ॥ दीन होतां कांहीं । होऊं नेदी वेगळें ॥ २ ॥ उपाय अपाय या पुढें । खोटे निवडितां कुडें ॥ जोडूनियां पुढें । हात उभे नुपेक्षी ॥ ३ ॥ तें घ्यारे सावकाशें । जया फावेल तो तैसें ॥ तुका म्हणे रसें । प्रेमाचिया आनंदें ॥ ४ ॥

॥ ६८५० ॥ गोपाळ म्हणती कान्होबा या रे कांहीं मागों । आपुलाले आम्ही जीवींची तया आवडी सांगों ॥ एक म्हणती उगे रे उगे मागेंचि लागों । निजों नका कोणी घरीं रे आजी अवघेचि जागों ॥ १ ॥ जाणोनी

नेणता हरि रे मध्यें उगाचि बैसे । नाइकोनी बोल आइके कोण कोणाचे कैसे ॥ एक एकाच्या संवादा जाणे न मिळेचि ऐसें । पोटींचें होटा आणवी देतो तयांसी तैसें ॥ २ ॥ एक ह्मणती बहु रे आह्मी पीडिलों माया । नेदी दहींभातसिदोरी ताक घालिती पिया ॥ तापलों वळितां गोधनें नाहीं जीवन छाया । आतां मागों पोटभरी रे याच्या लागोनी पायां ॥ ३ ॥ एक ह्मणती अरे तुमचें पोट तें किती । मागों गाई ह्मैसी घोडे रे धन संपत्ति हत्ति ॥ देव गडी कान्हो आमुचा आह्मां काय विपति । कन्याकुमरें दासी रे बाजा-वरी सुपती ॥ ४ ॥ एक ह्मणती बेटे हो कोण करी जतन । गाढव तैसेंचि घोडें रे कोण तयाचा मान ॥ लागे भवरोग वाहतां खांदीं चवघे जण । हातीं काठ्या डोया बोडक्या हिंडों मोकळे राण ॥ ५ ॥ एक ह्मणती रानीं रे बहु सावजें फार । फाडफाडूं खाती डोळे रे पाय नेतील कर । राखोनि राखे आपण ऐसा कइचा शूर । बैसोनी राहों घरीं रे कोण करी हे चार ॥ ६ ॥ घरीं बैसलिया बहुतें बहु सांगती काम । रिकामें कोणासि नावडे ऐसें आह्मासी ठावें ॥ चौघांमध्यें बरें दिसेसें तेथें नेमक व्हावें । लपोनी सहज खेळतां भलें गडियासवें ॥ ७ ॥ एक ह्मणती गडी ते भले मिळती मता । केली तयावरी चाली रे बरी आपुली सत्ता ॥ नसावे ते तेथें तैसे रे खेळ हाणितां लाता । रडी एकाएकीं गेलिया गोंधळ उठती लाता ॥ ८ ॥ एक ह्मणती खेळतां उगीं राहती पोरें । ऐसें काय घडों शके रे कोणी लहान थोरें ॥ अवघीं येती रागा रे एका ह्मणतां बरें । संगें वाढे कलह हरावा एकाएकींच खरें ॥ ९ ॥ एक ह्मणती एकला रे तूं जासील कोठें । सांडी मांडी हें वाउगें तुझें बोलचि खोटें ॥ ठायीं राहा उगे ठायींच कां रे सिणसी वाटे । अवघियांची सिदोरी तुझे भरली मोटे ॥ १० ॥ तुका ह्मणे काय काहण्या अरे सांगाल गोष्टी । चाटावे तुमचे बोल रे भुका लागल्या पोटीं ॥ जागा करूं या रे कान्होबा मागों कवळ ताटीं । धाले गडी तुका ढेकर देतो विठ्ठल कंठीं ॥ ११ ॥

॥ ६८८१ ॥ आजी ओस अमरावती । काला पाहावया येती ॥ देव विसरती । देहभाव आपुला ॥ १ ॥ आनंद न समाये मेदिनी । चारा विसरल्या पाणी ॥ तटस्थ सा ध्यानीं । गाई झाल्या श्वापदें ॥ २ ॥ जें या देवांचें दैवत । उभें आहे या रंगांत ॥ गोपाळांसहित । क्रीडा करी कान्होबा ॥ ३ ॥ तया सुखाची शिराणी । तींच पाउलें मेदिनी ॥ तुका ह्मणे मुनी । धुंडितां न लाभती ॥ ४ ॥

॥ ६८५२ ॥ चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटीं । मांडियेला काला भोंवतीं गोपाळांची दाटी ॥ १ ॥ आनंदें कवळ देती एकामुखीं एक । न ह्मणती सान थोर अवघीं सकळीक ॥ २ ॥ हमामा हुंबरी पांवा वाजविती मोहरी । घेतलासे फेर माजी घालूनियां हरी ॥ ३ ॥ लुब्धल्या नारी नर अवघ्या पशुयाती । विसरली देहभाव शंका नाहीं चित्तीं ॥ ४ ॥ पुष्पांचा वरुषाव झाली आरतियांची दाटी । तुळसी गुंफोनियां माळा घालितील कंठीं ॥ ५ ॥ यादवांचा राणा गोपीमनोहर कान्हा । तुका ह्मणे सुख वाटे देखोनियां मना ॥ ६ ॥

॥ ६८५३ ॥ माझे गडी कोण कोण । निवडा भिन्न यांतुनी ॥ १ ॥ आपआपणामध्यें मिळों । एक खेळों एकाशीं ॥ २ ॥ घावरियांच्या मोडा काड्या । धाडा भ्याडां वळतियां ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवापाशीं । विटाळशीं नसावीं ॥ ४ ॥

॥ ६८५४ ॥ हेचि अनुवाद सदा सर्व काळ । करुनियां गोपाळकाला सेवूं ॥ १ ॥ वोसरलें कामधेनूचें दुभतें । संपूर्ण आइतें गगनभरी ॥ २ ॥ संत सनकादिक गोमट्या परवडी । विभाग आवडी इच्छेचिये ॥ ३ ॥ तुका ह्मणे मधीं घालूं नारायण । मग न्हे सीण कोणा खेळें ॥ ४ ॥

॥ ६८५५ । अधिकाचा मज कांटाळा । तुह्मां गोपाळां संगति ॥ १ ॥ काय नाहीं तुह्मांपाशीं । सकळांविशीं संपन्न ॥ २ ॥ उद्योगाचा नेघें भार । लागल्या सार पुरतें ॥ ३ ॥ तुका ह्मणे अधीर जिणें । नारायणें न करावें ॥ ४ ॥

॥ ६८५६ ॥ झालों आतां एके ठायीं । न वंचूं कांहीं एकमेकां ॥ १ ॥ सरलों हें गे देउनि मोट । कटकट काशाची ॥ २ ॥ सोडोनियां गांठीं पाहें । काय आहे त्यांत तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे झालों निराळा । आतां गोपाळा देऊं बोभा ॥ ४ ॥

॥ ६८५७ ॥ या रे करूं गाई । जना निजलेती काई ॥ बोभाटानें आई । घरा गेल्या मारील ॥ १ ॥ घाला घाला रे कुकारे । ज्याची तेणेंचि मोहरे ॥ एवढेंचि पुरे । केलियानें सावध ॥ २ ॥ नेणोनियां खेळा । समय समयाच्या वेळा ॥ दुश्चिताजवळा । मिळालेति दुश्चित ॥ ३ ॥ तुका ह्मणे शीक । न धरतां लागे भीक ॥ धरा सकळीक । मनेरी धांवा वळतियां ॥ ४ ॥

॥ ६८५८ ॥ बोललिचा दोहूं पान्हा । मज कान्हा सांगितला ॥ १ ॥ घ्याजि हेंगे क्षीर हातीं । निगुतिनें वाढावें ॥ २ ॥ सांगितलें केलें काम । नव्हे धर्म सत्याचा ॥ ३ ॥ तुका ह्मणें नवें जुनें । ऐसें कोणें सोसावें ॥ ४ ॥

॥ ६८५९ ॥ येईल ते घेइन भागा । नव्हे जोगा दुसरिया ॥ १ ॥ आवडी तें तुह्मी जाणा । बहु गुणा सारिखी ॥ २ ॥ मज घेती डांगवरी । सवें हरि नसालिया ॥ ३ ॥ तुका ह्मणे रावत्रा देवा । करुनि सेवा सांगितली ॥ ४ ॥

॥ ६८६० ॥ अंतरली कुटी भेटी । भय धरूनियां पोटीं ॥ ह्मणतां जगजेठी । धांवे करुणाउत्तरीं ॥ १ ॥ बाप बळिया शिरोमणी । उतावीळ या वचनीं ॥ पडालिया कानीं । धांवा न करी आळस ॥ २ ॥ बळ दुनी शरणागता । स्वामी वाहों नेदी चिंता ॥ आईतेंचि दाता । पंगतीस बैसवी ॥ ३ ॥ वाहे खांदीं पाववी घरा । साचा करी येरझारा ॥ बोबड्या उत्तरा । स्वामी तुकया मानवे ॥ ४ ॥

॥ ६८६१ ॥ धन्य तें गोधन कांबळी काष्टिका । मोहरी पांवा निका ब्रीद वांकी ॥ १ ॥ धन्य तें गोकुळ धन्य ते गोपाळ । नर नारी सकळ धन्य झाल्या ॥ २ ॥ धन्य ते देवकी जसवंती दोहींचें । वसुदेवनंदाचें भाग्य झालें ॥ ३ ॥ धन्य त्या गोपिका सोळा सहस्र बाळा । यादवां सकळां धन्य झालें ॥ ४ ॥ धन्य ह्मणे तुका जन्मा तींचि आलीं । हरिरंगीं रंगलीं सर्वभावें ॥ ५ ॥

॥ ६८६२ ॥ गौळणी बांधिती धारणासी गळा । खेळे त्या गोपाळांमाजी ब्रह्म ॥ १ ॥ धांवोनियां मागे यशोदे भोजन । हिंडे रानोरान गाईपाठीं ॥ २ ॥ तुका ह्मणे सर्व कळा ज्याचे अंगीं । भोळेपणालागीं भीक मागे ॥ ३ ॥

॥ ६८६३ ॥ देखिलासी माती खातां । दावियानें बांधी माता ॥ १ ॥ जाळी घेउनि कांबळी काठी । गाई वळी वेणू पाठीं ॥ २ ॥ मोठें भावार्थाचें बळ । देव झाला त्याचें बाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे भक्तांसाठीं । देव धांवे पाठोपाठीं ॥ ४ ॥

॥ ६८६४ ॥ हा गे माझे हातीं । पाहा कवळ सांगातीं ॥ १ ॥ देवें दिला खातों भाग । कराल तर करा लाग ॥ २ ॥ घालें ऐसें पोट । वरी करूनियां बोट ॥ तुका ह्मणे घरीं । मग कैचा या परी ॥ ४ ॥

॥ ६८६५ ॥ अवघें अवघीकडे । दिलें पाहे मजकडे ॥ अशा संवगडे । स
हित थोरी लागली ॥ १ ॥ कां रे धरिला अबोला । माझा वांटा देईं मला ॥ सि
दोरीचा केला । झाडा आतां निवडेना ॥ २ ॥ भूक लागली अनंता । कां
नेणसी जाणतां । भागलों वाळितां ॥ गाई सैरा ओढाळा ॥ ३ ॥ तुका करुण
भाकी । हरि पाहे गोळा टाकी ॥ घेता झाला सुखी । भीतरी वांटी आणीकां ॥ ४ ॥

॥ ६८६६ ॥ आम्हीं गोवळीं रानटें । नव्हों जनांतील धीटें ॥ १ ॥ सिदो
रीचा करूं काला । एक बांटितों एकाला ॥ २ ॥ खेळों आपआपणाशीं । आमचीं
तीं आह्मांपाशीं ॥ ३ ॥ मिळालों नेणते । तुका कान्होबा भोंवतें ॥ ४ ॥

॥ ६८६७ ॥ "अवघियां दिला गारे । मजकरे पाहीना" ॥ १ ॥ फुंदे गो
पाळ डोळे चोळी । हुंगा थापली ह्मणे तोंडा ॥ २ ॥ आवडती थोर मोटे । मी
पोरटें दैन्यवाणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाणों भाव । जीवींचा देव बुझावी ॥ ४ ॥

॥ ६८६८ ॥ जिवीं जिवा मिठी देऊं । कान्हो नीट झोंबी घेऊं ॥ १ ॥
बाप झोंबी सावळ्यासी । मी तूं नाहींरे आह्मांसी ॥ २ ॥ तुमची सोडोनी
चिकोटी । वेगीं धरूं याची काठी ॥ ३ ॥ हातीं रिघाले हात । पाय रिघा-
ले पायांत ॥ ४ ॥ जिवीं जिवा पडली मिठी । तुका निरवाणी गोठी ॥ ५ ॥

॥ ६८६९ ॥ मजसवें पोरा कुस्ती जरी घेसी ॥ तरीच तूं होसी श्लाघ्य-
वाणें ॥ १ ॥ आह्मासवें कोणा पुरी पडे तुझी । धरी आतां माझी चिको-
टी हे ॥ २ ॥ हातां हात डोई न लावितां अंग ॥ झुगारीन चांग पाहे
आतां ॥ ३ ॥ पाय घालुनियां हाड तें पाहतां ॥ पाडीन मी आतां उफरा-
टें ॥ ४ ॥ तुका ह्मणे नको पळों धीर धरी ॥ नाहीं तरी उरीं टोले
खासी ॥ ५ ॥

## मृदंग पाट्या

॥ ६८७० ॥ मागें पुढें पाहें सांभाळूनी दोन ठाय । चुकावूनां जाय
गडी राखे गडियांसी ॥ १ ॥ मुरडे दंडा दोहीं तोडें गडियां सावध करी ।
भेटातियासंगें तया हाल तुजवरी ॥ २ ॥ गडियां गडी वांटुनी देईं । ज्याचा
सोडी तेचि ठायीं ॥ ३ ॥ अगळ्या बळें करील काय । तुज देणें लागे
डोय ॥ ४ ॥ नवां घरी पाउला करीं । सांपडे तो तेथें धरीं ॥ ५ ॥ जिंकोनि
डाव करीं । टाहो सत्ता आणिकांवरी । ६ ॥ सांपडोनी डाईं बहु । काळ

गुंतलासी ॥ ७ ॥ बळिया गाडि फळी । फोडी न धरतां सांसी ॥ ८ ॥ चुकांडी जो खाय मिळोनी अंगीं जाय । गुंतलासी काय तुका ह्मणे अझूनी ॥ ९ ॥

॥ ६८७१ ॥ पाहा रे तमासा तुमचा येथें नव्हे लाग । देईन तो भाग आलियाचा बाहेरी ॥१॥ जागा रे गोपाळांनो ठायींठायीं जागा । चाहुलिनें भागा दूर मजपासूनी ॥ २ ॥ न रिघता ठाव आह्मां ठावा पाळतियां । भयाभीत वांयां तेथें काय चांचपा ॥ ३ ॥ तुका म्हणे हातां चढे जीवाचिये साठीं । मिटक्या देतां गोड मग लागतें शेवटीं ॥ ४ ॥

॥ ६८७२ ॥ डाई घालूनियां पोरें । त्यांचीं गुरें चुकविलीं ॥ १ ॥ खेळ खेळतां फोडिल्या डोया । आपण होय निराळा ॥ २ ॥ मारिती माया घेती जीव । नाहीं किंव अन्यायें ॥ ३ ॥ तुका कान्होबा मागें । तया अंगें कळों आलें ॥ ४ ॥

॥ ६८७३ ॥ आतां हेंचि जेऊं हेंचि जेऊं । सवें घेऊं सिदोरी ॥ १ ॥ हरिनामाचा खिचडा केला । प्रेमें मोहिला साधन ॥ २ ॥ चवीं चवीं घे ग्रास । ब्रह्मरस आवडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे गोड लागे । तों तों मागें रसना ॥ ४ ॥

॥ ६८७४ ॥ अवघेंचि गोड झालें । मागीलये भरी आलें ॥ १ ॥ साह्य झाला पांडुरंग । दिला अभ्यंतरीं संग ॥ २ ॥ थडिये पावतां तो वाव । मागें वाहावतां ठाव ॥ ३ ॥ तुका ह्मणे गेलें । स्वप्नींचें जागें झालें ॥ ४ ॥

॥ ६८७५ ॥ तुजसवें येतों हरी । आह्मां लाज नाहीं तरी ॥ उचलिला गिरी । चांग तईं वांचलों ॥ १ ॥ मोडा आतां खेळ । गाई गेल्या झाला वेळ ॥ फांकल्या ओढाळ । नाहीं तोंचि आवरा ॥ २ ॥ चांग दैवें यमुनेसी वांचलों बुडतां । निळाजिरीं आह्मी नाहीं भय धाक या अनंता ॥ ३ ॥ खातों आगी माती । आतां पुरे हा सांगाती ॥ भोंवतां भोंवेल । आह्मां वाटतें हें चित्तीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे उरी नाहीं तुजसवें । शाहाणिया दुरी छंद भोळियांसवें ॥ ५ ॥

॥ ६८७६ ॥ नको आम्हां सवें गोपाळा । येऊं ओढाळा तुझ्या गाई ॥१॥ कोण धांवे त्यांच्या लागें । मागें मागें येरझारी ॥२॥ न बैसती एके ठायीं । धांवती दाही दाहा वाटां ॥ ३ ॥ तुका ह्मणे तूं राख मनेरी । मग त्या येरी आह्मी जाणों ॥ ४ ॥

॥ ६८७७ ॥ मागायास गेलों सिदोरी । तुझ्या मायाघरीं गांजियेलों ॥ १ ॥ तुजविणें ते नेदी कोणा । सांगतां खुणा जिवें गेलों ॥ २ ॥ वांयांविण केली येरझार । आतां पुरे घर तुझी माया ॥ ३ ॥ तुका म्हणे तूं आम्हां वेगळा । राहें गोपाळा म्हणउनी ॥ ४ ॥

॥ ६८७८ ॥ काकुलती येतो हरी । क्षणभरी निवडीतां ॥ १ ॥ तुमची मज लागली सवे । ठायींचे नवे नव्हों गडी ॥ २ ॥ आणीक बोलाविती फार । बहु थोर नावडती ॥ ३ ॥ भाविकें सांची आवडी मोठी । तुका म्हणे मिठी घाली जिवें ॥ ४ ॥

॥ ६८७९ ॥ वरता वेंधोनी घातली उडी । कळंबाबुडीं यमुनेसी ॥ १ ॥ हरि बुडाला बोंब घाला । घरचीं त्याला ठावा नाहीं ॥ २ ॥ भवनदीचा न कळे पार । काळिया माजी थोर विखार ॥ ३ ॥ तुका म्हणे काय वाउग्या हाका । हातींचा गमावुनियां थिका ॥ ४ ॥

॥ ६८८० ॥ अवघीं मिळोनि कोल्हाळ केला । आतां होता ह्मणती गेला ॥ १ ॥ आपलिया रडती भावें । जयासवें जयापरी ॥ २ ॥ चुकलों आह्मी खेळतां खेळ । गेला गोपाळ हातींचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे धांवती थडी । न घाली उडी आंत कोणी ॥ ४ ॥

॥ ६८८१ ॥ भ्यालीं जिवा चुकलीं देवा । नाहीं ठावा जवळी तो ॥ १ ॥ आहाकटा करिती हाय । हात डोकें पिटिती पाय ॥ २ ॥ जवळी होतां न कळे आम्हां । गेल्या सीमा नाहीं दुःखा ॥ ३ ॥ तुका ह्मणे हा लाघवी मोठा । पाहे खोटा खरा भाव ॥ ४ ॥

॥ ६८८२ ॥ काळिया नाथूनी आला वरी । पैल हरी दाखविती ॥ १ ॥ दुसरिया भावें न कळे कोणा । होय नव्हेसा संदेह मना ॥ २ ॥ रूपा भिन्न पालट झाला । गारे सांवळेंसा पै देखिला ॥ ३ ॥ आश्वासीत आला करें । तुका खरें ह्मणे देव ॥ ४ ॥

॥ ६८८३ ॥ हरि गोपाळांसवें सकळां । भेटे गळया गळा मेळवूनी ॥ १ ॥ भाविकें सांची आवडी मोठी । सांगे गोष्टी जीवींचिया ॥ २ ॥ योगियांच्या ध्याना जो नये । भाकरी त्यांच्या मागोनि खाये ॥ ३ ॥ तुका ह्मणे असे शाहाणियां दुरी । बोबडियां दास हाका मारी ॥ ४ ॥

॥ ६८८४ ॥ धांव कान्होबा गेल्या गाई । न ह्मणे मी कोण ही काई ॥ १ ॥ आपुलियाचें वचन देवा । गोड सेवा करीतसें ॥ २ ॥ मागतां आ-

धीं द्यावा डाव । बळिया मी तो नाहीं भाव ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐशा सर्वें । अनुसरावें जीवेंभावें ॥ ४ ॥

॥ ६८८५ ॥ आणीक काय थोडीं । परि तीं फार खोटीं कुडीं ॥ ॥ १ ॥ सदा मोकळींच गुरें । होती फजीत तीं पोरें ॥ २ ॥ सदा घालिती हुंबरी । एक एकांचें न करी ॥ ३ ॥ तुका ह्मणे घरीं । माय वेळो वेळां मारी ॥ ४ ॥

॥ ६८८६ ॥ बहुतांचे संगती । बहु पावलों फजिती ॥ १ ॥ बरें केलें नंदबाळें । मागिलांचें तोंड काळें ॥ २ ॥ माझा करितील तंटा । लपती आलिया बोभाटा ॥ ३ ॥ तुका ह्मणे काई । किती ह्मणों बाप आई ॥ ४ ॥

॥ ६८८७ ॥ गाईन ते लीळा चरित्र पवाडे । राखिले सवंगडे सहित गाई ॥ १ ॥ चोरिलें नवनीत बांधविला गळा । जे तुह्मी गोपाळा छंद केले ॥ २ ॥ मोहिल्या गोपिका पांवयाच्या छंदें । केली ते गोविंदें क्रीडा गाऊं ॥ ३ ॥ मायबापा लाड दाखविलें कौतुक । तें या आणूं सुख अंतरासी ॥ ४ ॥ निर्दाळिले दुष्ट भक्तां प्रतिपाळी । ऐसा ह्मणों बळी आमुचा स्वामी ॥ ५ ॥ तुका म्हणे सरसी असों येणें बोधें । लागोनी संबंधें सर्वकाळ ॥ ६ ॥

॥ ६८८८ ॥ आजी कां वो तूं दिससी दुश्चित्ती । ह्मणे एका मन लगे तुझ्या चित्तीं ॥ दिलें ठेवूं तें विसरसी हातीं । नेणों काय बैसला हरि चित्तीं वो ॥ १ ॥ सर सर परती झालीस आतां भांड । कैसें दाखविसी जगासी या तोंड ॥ व्याली माय ते लाजविली रांड । नाहीं थार दो ठायीं झाला खंड वो ॥ २ ॥ होतें तैसें तें उमटलें वरी । बाह्य संपादणी अंतरींची चोरी ॥ नाहीं मर्यादा निःसंग बावरी । मन हें गोविंदीं देह काम करी वो ॥ ३ ॥ नाहीं करीत उत्तर कोणासवें । पराधीन भोजन दिलें खावें ॥ नाहीं अचळ सावरावा ठावे । देखों उदासीन तुज गे देहभावें वो ॥ ४ ॥ कोठें नेणों हा फावला एकांत । सदा किलकिल भोंवतीं बहुत ॥ दोघे एकवाटा बोलावया मात । नाहीं लाज धरिली दिला हात वो ॥ ५ ॥ करी कवतुक खेळ खेळे कान्हा । दावी लाघव भांडवी सासुसुना ॥ परा भक्ति हे शुद्ध तुह्मी जाणा । तुका ह्मणे ऐसें कळों यावें जना वो ॥ ६ ॥

॥ ६८८९ ॥ भरिला उलंडूनी रिता करी घट । मिसि पाणियाचें गोविंदाची चट ॥ चाले झडझडां उरांतुनी वाट । पाहे पाळतुनी उभा तोचि नीट वो ॥ १ ॥ चाळा लाविंयेले गोप गोपीनाथें । जाणें आवडीचें रूप जेथें तेथें ॥ दावी बहुतांच्या बहुवेष पंथें । गुणातीतें खेळ मांडियेला येथें वो ॥ २ ॥ मनीं आवडे तें करावें उत्तर । कांहीं निमित्ताचा पाहोनी आधार ॥ उगा राहे कां मारिसी कंकर । मात वाढविसी उत्तरा उत्तर वो ॥ ३ ॥ धरिली खोडी दे टाकोनियां मागें । न ये विनोद हा काना मशीं संगें ॥ मिठी घालीन या जीवाचिया त्यागें । नाहीं ठाउकीं पडिलीं तुझीं सोंगें वो ॥ ४ ॥ सुख अंतरींचें बाह्य ठसठसी । ह्मणे विनोद हा काय सोंग यासी ॥ तुज मज काय सोयरीक ऐसी । नंदानंदन या थोरपणें जासी वो ॥ ५ ॥ करी कारण तें कळों नेदी कोणा । सुख अंतरींचें बाह्य रंग जाणा ॥ मन मिनलें रे तुका ह्मणे मना । भोग अंतरींचा पावे नारायणा वो ॥ ६ ॥

॥ ६८९० ॥ आजी नवल मी आलें येणें रानें । भेटी अवचिती नंदाचिया कान्हें ॥ गोवी सांगती वो सकळ ही जन । होतें संचित आणियेलें तेणें वो ॥ १ ॥ गेलें होऊनी न चले आतां कांहीं । साद घालितां जवळी दुजें नाहीं ॥ अंगीं जडला मग उरलें ते काई । आतां राखतां गुमान भलें बाई वो ॥ २ ॥ बहुत कामें मज नाहीं आराणूक । एक सारितां तों पुढें उभें एक ॥ आजी मी टाकोनी आलें सकळीक । तंव रचिलें आणीक कवतुक वो ॥ ३ ॥ चिंता करितां हरिली नारायणें । अंगसंगें मिनतां दोघेजणें । सुखें निर्भर झालियें साच्या गुणें । तुका ह्मणे खुंटलें येणें जाणें वो ॥ ४ ॥

॥ ६८९१ ॥ मैं भुली घरजानी बाट । गोरस बेचन आयें हाट ॥ १ ॥ कान्हा रे मनमोहन लाल । सब ही बिसरूं देखे गोपाल ॥ २ ॥ काहां पग डारूं देख आनेरा । देखें तों सब वोहिन घेरा ॥ ३ ॥ हुं तों थकित भैर तुका । भागा रे सब मनका धोका ॥ ४ ॥

॥ ६८९२ ॥ हरिबिन रहियां न जाये जिहिरा । कबकी थाडी देखें राहा ॥ १ ॥ क्या मेरे लाल कवन चुकी भई । क्या मोहिपासिती बेर लगाई ॥ २ ॥ कोई सखी हरी जावे बुलावन । बार हि डारूं उसपर तन ॥ ३ ॥ तुका प्रभु कब देखें पाऊं । पासीं आऊं फेर न जाऊं ॥ ४ ॥

॥ ६८९३ ॥ भलो नंदाजीको डिकरो । लाज राखीलीन हमारो ॥ १ ॥ आगळ आवो देवजी कान्हा । मैं घरछोडी आहे ह्माना ॥ २ ॥ उनसुं कळ-

ना नव्हे तो भला । खसम अहंकार दादुला ॥ ३ ॥ तुका प्रभु परबळ हरी । छपी आहे हुं जगाथी न्यारी ॥ ४ ॥

॥ ६८९४ ॥ नका कांहीं उपचार माझ्या शरीरा । करूं न साहावे मज बहु होतो उबारा ॥ मनोजन्य व्यथा वेध झाला अंतरा । लवकरी आणा नंदाचिया कुमारा ॥ १ ॥ सांखिया वेशिया तुह्मी प्राणवल्लभा । निवेदिला भाव आर्तभूत या लोभा ॥ उमटली अंगीं वो सांवळी प्रभा । साच हे अवस्था कळे मज माझ्या क्षोभा ॥ २ ॥ नये कळों नेदावी हे दुजियासी मात । घडावा तयासी उत्कंठा एकांत । एकाएकीं साक्षी येथें आपुलें चित्त । कोण्या काळें होईल नेणों भाग्य उदित ॥ ३ ॥ स्वाद सीण देहभान निद्रा खंडन । पाहिले तटस्थ उन्मळित लोचन ॥ अवघें वोसाऊन उरले ते चरण । तुका ह्मणे दर्शनापें आलें जीवन ॥ ४ ॥

॥ ६८९५ ॥ पडिली भुली धांवतें सैराट । छंद गोविंदाचा चोजवितें वाट ॥ मागें सांडोनी सकळ बोभाट । वंदी पदांबुजें ठेवूनि ललाट वो ॥ १ ॥ कोणी सांगा या गोविंदाची शुद्धि । होतें वहिलें लपाला आतां खांदीं ॥ कोठें आड आली हे देहबुद्धि । धांवा आळवीं करुणा कृपानिधी वो ॥ २ ॥ मागें बहुतांचा अंतरला संग । मुळें जयाचिया तेणें केला त्याग ॥ पहिलें पाहातां तें हरपलें अंग । खुंटली वाट नाहींसें झालें जग वो ॥ ३ ॥ शोकें वियोग घडला सकळांचा । गेल्या शरण हा अन्याय आमुचा ॥ केला उच्चार रे घडल्या दोषांचा । झाला प्रगट स्वामी तुकयाचा वो ॥ ४ ॥

॥ ६८९६ ॥ काय उणें कां करितोसी चोरी । किती सांगों तुज नाइकसी हरी ॥ पर परतां तूं पळोनी जासी दुरी । अनावर या लौकिका बाहेरी वो ॥ १ ॥ माया करुणा हे करिते बहुत । किती सोसूं या जनांचे आघात ॥ न पुरे अवसरु हेंचि नित्यानित्य । तूंचि सोडवीं करूनी स्थिर चित्त वो ॥ २ ॥ बहुत कामें मी गुंतलियें घरीं । जासी डोळा तूं चुकवूनी हरी ॥ करितां लाग न येसीच पळभरी । नाहीं सायासाची उरों दिली उरी वो ॥ ३ ॥ तुज ह्मणीयें मी न संगें अनंता । नको जाऊं या डोळियां परता ॥ न लगे जोडी हे तुजविण आतां । तुकया स्वामी कान्होबा गुणभरिता वो ॥ ४ ॥

॥ ६८९७ ॥ घाली कवाड टळली वाड राती । कामें व्यापिली कां पडिली दुश्चिती ॥ कोणे लागला गे सदैवेचे हातीं । आजी शून्य शेजे नाहीं दिसे पति वो ॥ १ ॥ बोले दूतिकेशी राधा हें वचन । मशीं लाघव दाखवी

नारायण ॥ ह्मणे कोमळ परी बहु गे निर्गुण । याशीं न बोलें कळला मज पूर्ण वो ॥ २ ॥ धाडिलें गरुडा आणिलें हनुमंता । तैं पाचारिलें होउनि ये वो सीता ॥ लाजिनली रूप न ये पालटितां । झाला भीमकी आपण राम सीता वो ॥ ३ ॥ सत्यभामा दान करी नारदासी । तैं कळला वो मज हृषीकेशी ॥ तुळे घालितां न ये कनक वो रासी । सम तुकें एक पान तुळसी वो ॥ ४ ॥ मज भुली पडली कैशापरी । आह्मां भोगूनी ह्मणे मी ब्रह्मचारी ॥ दिली वाट यमुने माये खरी । तुह्मां आह्मां नकळे अद्यापवरी वो ॥ ५ ॥ जाणे जीवींचें सकळ नारायण । असे व्यापूनी तो न दिसे लपून ॥ राधा संबोखिली प्रीती आलिंगून । तुका ह्मणे येथें भावचि कारण वो ॥ ६ ॥

॥ ६८९८ ॥ मिळोनी गौळणि देती यशोदे गाऱ्हाणीं । दहीं दूध तूप लोणी शिंकां नुरे कांहीं ॥ मेळवूनी पोरें तेथें रिघे एकसरें । वेगीं आणोनी सामोरें तेथें लोणी खाय ॥ १ ॥ हरि सोंकला वो हरि सोंकला वो । सोंकला तो वारीं तुज लाज नाहीं तरी ॥ आह्मां सांपडतां उरी तुज मज नाहीं ॥ २ ॥ तुज वाटतसे कोड यासी लागतसे गोड । काय हासतेसी वेड तुज लागलें वो ॥ आह्मी जाऊं तुजवरी पोरें चाळविल्या पोरी । काय सांगों भांडखोरी लाज वाटे आह्मां ॥ ३ ॥ मुख माळिण वदन उभा हाडतिये घोणें। तंव दसवंती ह्मणे आणा शीक लावूं ॥ थोर आणिला कांटाळा घरींदारीं लोकपाळां । डेरा रिघोनी गुसळा तेथें लोणी खाय ॥ ४ ॥ मिळोनी सकळा दावें लावूनियां गळां । कैशा बांधिती उखळा तेथें राहे उगा ॥ बरा सांपडलासी हरी आजिच्यानें करिसील चोरी । डोळे घालूनियां येरी येरीकडे हांसे ॥ ५ ॥ फांकल्या सकळा उपडूनियां उखळा । मोडी वृक्ष विमळार्जुन दोन्ही ॥ उठिला गजर दसवंती नव्हे धीर । धांवे तुकयाचा दातार आळंगिला वेगीं ॥ ६ ॥

॥ ६८९९ ॥ बाळपणीं हरि । खेळे मथुरे माझारी ॥ पायीं घागरिया सरी । कडदोरा वांकी ॥ मुख पाहे माता । सुख न माये चित्ता ॥ धन्य मानव संचिता । वोडवलें आजी ॥ १ ॥ बाळ चांगलें वो । बाळ चांगलें वो ॥ ह्मणतां चांगलें । वेळ लागे तया बोलें ॥ जीवापरीस तें वाल्हें । मज आवडतें ॥ २ ॥ मिळोनियां याती । येती नारी कुमारी बहुती ॥ नाहीं आठव सां चित्तीं । देहभाव कांहीं ॥ विसरल्या घरें । तान्हीं पारठीं लेंकुरें ॥ धाक सांडोनियां येरें । तान भूक नाहीं ॥ ३ ॥ एकी असतील घरीं । चित्त तया·

पासीं परी ॥ वेगीं करोनी वोसरी । तेथें जाऊं पाहे ॥ लाज सांडियेली वोज । नाहीं फजितीचें काज ॥ सुख सांडोनियां सेजे । तेथें धाव घाली ॥ ४ ॥ वेधियेल्या बाळा । नर नारी या सकळा ॥ बाळा खेळवी अवला । त्याही विसरल्या ॥ कुमर कुमारी । नाभाव हा शरीरीं ॥ दृष्टी न फिरे माघारी । तया देखतां हे ॥ ५ ॥ वैरभाव नाहीं । आप पर कोणी कांहीं ॥ शोक मोह दुःख ठायीं । तया निरसलीं ॥ तुका ह्मणे सुखी । केलीं आपणासारिखीं ॥ स्वामी माझा कवतुकें । बाळवेषें खेळे ॥ ६ ॥

॥ ६९०० ॥ गोरस घेऊनी सातें निघाल्या गौळणी । तंव ती कृष्णाची करणी काय करी तेथें ॥ झाला पानसरा मिठी घातली पदरा । आधीं दान माझें सारा मग चाला पंथें ॥ १ ॥ सर जाऊं दे परता । मुलीं भेटलासी आतां ॥ नाट लागलें संचिता । खेपा खुंटलिया ॥ २ ॥ आसुडी पदरा धरी आणीक दुसरा । येरी झोंबतील करा काय वेडा होसी ॥ आलों गेलों बहु वेळां नेणों गोरा कीं सांवळा । सर परता गोवळा काय बोलतोसी ॥ ३ ॥ आह्मी येथें अधिकारी मागें केली तुह्मी चोरी । आतां कळलियावरी मागें केलें साचें ॥ बोलिल्या हांसुनी आह्मी सासुरवासिनी । कां रे झोंबसी दुरुनी करी मात कांहीं ॥ ४ ॥ वांयां परनारी कैशा धरिसी पदरीं । तयां कळलिया उरी तुज मज नाहीं ॥ जडला जिव्हारीं फांकों नेदी तया नारी । जेथें वर्म तें धरी जाऊं पाहे तियेचें ॥ ५ ॥ तया हातीं सांपडल्या हाटीं पाटीं चुकाविल्या । कृष्णमिळणीं मिळाल्या त्याही न फिरती ॥ तुका ह्मणे खंती वांयां न धरावी चित्तीं । होतें तुमच्या संचितीं वोडवलें आजी ॥ ६ ॥

॥ ६९०१ ॥ हरी तुझी कांति रे सांवळी । मी रे गोरी चांफेकळी । तुझ्या दर्शनें होईन काळी । मग हें वाळी जन मज ॥ १ ॥ उगला राहें न करी चाळा । तुज किती सांगों रे गोवळा ॥ तुझा खडबड कांबळा । अरे नंदबाळा आलगटा ॥ २ ॥ तुझिये अंगीं घुरट घाणी । बहु खासी दुध तुप लोणी ॥ घरिचें बाहेरील आणोनी । मी रे चांदणी सकुमार ॥ ३ ॥ मज ते हांसती जन । धिःकारिती मज देखोन । अंगीं तुझे देखोनी लक्षण ॥ मग विटंबणा होईल रे ॥ ४ ॥ तुज लाज भय शंका नाहीं । मज तंव सज्जन पिशुन त्याही ॥ आणीक मात बोलूं कांहीं । कसी भीड नाहीं तुज माझी ॥ ५ ॥ वचन मोडी नेदी हात । कळलें न साहेची मात ॥ तुकयास्वामी गोपीनाथ । जीवन्मुक्त करूनी भोगी ॥ ६ ॥

॥ ६९०२ ॥ सात पांच गौळणी आलिया मिळोनी यशोदे गाऱ्हाणें देती कैसें । काय व्यालीस पोर चोरटें सिरजोर जनावेगळेंचि कैसें ॥ दहीं दुध लोणी शिंकां नुरेचि कांहीं कवाड जैशाचें तैसें । चाळवूनी नाशिलीं कन्याकुमरें आमच्या सुनांसी लाविलें पिसें गे बाइये ॥ १ ॥ अझुनी तरी यासी सांगें बरव्या परी नाहीं तरी नाहीं उरी जीवेसाटी । मिळोनी सकळै जणी करूं वाखा सर्वां तुज मज होईल तुटी गे बाइये॥ २ ॥ नेणे आपपर लौकिक वेव्हार भलते ठायीं भलते करी । पाळतुनी घरीं आह्मी नसतां तेथें आपण संचार करी ॥ सोंगया चुंबन देतो आलिंगन लोळे सेजाबाजावरी ॥ शिंकीं कडा फोडी गोसाचे डेरे धरितां न सांपडे करीं गे बाईये ॥ ३ ॥ आतां याची चाड नाहीं आह्मां भीड सांपडतां कोड पुरवूं मनींचें । सोसिलें बहु दिस नव्हता केला निस ह्मणूनि एकुलतें तुमचें ॥ चरण खांबीं जीवें बांधेन सरिसा जवें न चले कांहीं यांचे । अर्थ प्राण देतां न सोडी सर्वथा भलतें हो या जिवाचें बाईगे ॥ ४ ॥ घेउनी जननी हातीं चक्रपाणी देतिसे गौळणी वेळोवेळां । निष्ठुर वाद ह्मणी बोलाल सकळा क्षोभ जाईल माझ्या बाळा ॥ जेथें लागे हात वाढतें नवनीत अमृताच्या कल्लोळा । देखोनि तुकयास्वामी देश देहभाव विसरल्या सकळा गे बाइये ॥ ५ ॥

॥ ६९०३ ॥ विरहतापें फूंद छंद करिते जाती । हा गे तो गे सावधान सर्वेचि दुश्चित ॥ न सांभाळूनि अंग लोटी पाहे भोंवतीं । वेगळीच पडों पाहे कुळाहूनि याती ॥ १ ॥ खुंटलीसी झाली येथें अवघियांची गती । आपलीं परावीं कोण नेणें भोंवतीं ॥ त्यांचीं नांवें बोभे अहो अहो श्रीपति । नवलाव हा येरां वाटोनियां हांसती ॥ २ ॥ बाहेरीच धांवें रानां न धरी च घर । न कळे बंधना झाला तेणे संचार ॥ विसरूनी गेली सासुरें कीं माहेर । एका अवलोकी एका पडिला विसर ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मी अवघ्या राहा निश्चळा । न ये आतां येऊं येथें सर्वथा बळा ॥ त्याचा त्याच्या मुखें अवघियांचा निर्वाळा । बहुतां मतें येथें तर्कवाद निराळा ॥ ४ ॥

॥ ६९०४ ॥ ये रे कृष्णा खुणाविती खेळों भातुकें । मिळालिया बाळा एके ठायीं कवतुकें ॥ कळों नेदी माया त्याचें त्यास ठाउकें । खेळतोंसें दावी लक्षलक्षापें मुकें ॥ १ ॥ अखंडित चटे त्यांनीं लावियेला कान्हा । आवडे

तया त्या संकल्प वाहाती मना ॥ काया वाचा मनें रूपीं गुंतल्या वासना । एकांताचें सुख जाती घेउनियां राना ॥ २ ॥ अवघियांचा जाणें झाला मेळा- सा हरी । मिळोनियां जावें तेथें तया भीतरी ॥ कळों नेदी घरिंच्या करी गोवूनी चोरी । हातोहातीं नेती परपरत्या दुरी ॥ ३ ॥ आनंदें निर्भर आप- णाशीं आपण । क्रीडतील बाळा त्यजिलें पारिखें जन ॥ एकाएकीं तेथें नाहीं दुसरें भिन्न । तुका ह्मणे एका नारायणावांचून ॥ ४ ॥

॥ ६९०५ ॥ खेळतां मुरारी जाय सरोवरा तिरीं । तंव नग्नचि या नारी तेथें देखियेल्या ॥ मांडिलें विंदान ख्याल सुखाचें संधान । अंग लपवूनी मान पिलंगत चाले ॥१॥ ख्याल मांडिला रे ख्याल मांडिला रे । पायां पड- तां रे न सोडी नेदी साउलां रे ॥ २ ॥ साज्या साउलीं पातळें गोंडें कस- णिया चोळ्या । बुंथी घेउनी सकळा कळंबावरी पळे ॥ खांदी धरूनियां करीं दृष्टि घालोनि सामोरी । बैसे पाला वोढी वरी खदखदां हांसे ॥ ३ ॥ आनं- दें कल्लोळ बाळा खेळती सकळ देती उलटिया चपळ । एकी एकीहूनी ह्मैस वेळ सुर काढी ॥ एकी उगविती कोडीं । नानापरीच्या निकडी खेळ मांडि- येला ॥ ४ ॥ एकी आलिया बाहेरी पाहे लुगडें तंव नारी । ह्मणे नाहीं नेलें चोरी काय जाणों केव्हां ॥ केला सकळीं हाकारा तंव आलिया बाहेरा । आतां ह्मणतील घरां जावें कैशा परी ॥ ५ ॥ तंव हांसे वनमाळी वरी पा- होनी सकळी । लाजे रिघालिया जळीं मागें पुढें हात ॥ लाज राखावी गोपाळा आह्मांजणींची सकळां । काय मागसी ये वेळा देऊं गुळवाटी ॥ ६ ॥ जोडोनियां कर या गे सकळी समोर । वांयां न बोलावें फार बडबड कांहीं ॥ भातुकें भूषण नाहीं चाड नेघें धन । करा एक चित्त मन या गे मजपाशीं ॥ ७ ॥ एक एकीकडे पाहे लाज सांडूनियां राहे । ह्मणे चला आतां सये जाऊं तयापाशीं ॥ जोडोनियां हात कैशा राहिल्या निवांत । तुका ह्मणे केली मात लाज राखिली तयांची ॥ ८ ॥

॥ ६९०६ ॥ धरिला पालव न सोडी माझा येणें । कांहीं करितां या नंदाचिया कान्हें ॥ एकली न येतें मी ऐसें काय जाणें । कोठें भरलें अवघड या राणें रे ॥ १ ॥ सोडीं पालव जाऊं दे मज हरी । वेळ लागल्या रे कोपतील घरीं ॥ सासू दारुण सासरा आहे भारी । तुज मज सांगतां नाहीं उरी रे ॥ २ ॥ सख्या वाशिया होत्या मजपाशीं । तुज फावलें रे फांकतां तयांसी ॥ होतें अंतर तर सांपडतें कैसी । एकाएकीं अंगीं जडलासी रे ॥ ३ ॥

कैसी भागली हे करितां उत्तर। शक्ति मावळल्या आसुडितां कर। स्वामी तुकयाचा भोगिया चतुर। भोग भोगी त्यांचा राखे लोकाचार वो ॥ ४ ॥

॥ ६९०७ ॥ गाई गोपाळ यमुनेचे तटीं। येती पाणिया मिळोनी जगजेठी। चेंडू चौगुणा खेळती वाळवंटीं। चला चला ह्मणती पाहूं दृष्टी वो ॥१॥ ऐशा गोपिका त्या कामातुरा नारी। चित्त विठ्ठल देखावया हरी॥ मिस पाणियाचे करितील घरीं। बारा सोळा मिळोनी परस्परीं वो ॥ २ ॥ चिरें चोळिया त्या धुतां विसरती। ऊर्ध्व लक्ष लागलें कृष्ण मूर्ती। कोणा नाठवे हे कोण कुळ याती। झालीं तटस्थ सकळ नेत्रपातीं वो ॥ ३ ॥ दंतधावनाचा मुखामाजी हात। वाद्यें वाजती नाइके जनमात॥ करी श्रवण कृष्णवेणुगीत। स्वामी तुकयाचा पुरवी मनोरथ वो ॥ ४ ॥

॥ ६९०८ ॥ कोठें मी तुझा धरूं गेलें संग। लावियेलें जग माझ्या पाठीं ॥ १ ॥ सर सर रे परता अवगुणाच्या गोवळा। नको लावूं चाळा खोटा येथें ॥ २ ॥ रूपाच्या लावण्यें नेली चित्तवृत्ति। न देखें भोंवतीं मी ते माझी ॥ ३ ॥ तुकयाचा स्वामी माझे जीवींच बैसला। बोलींच अबोला करूनियां ॥ ४ ॥

॥ ६९०९ ॥ कोणी एकी भुलली नारी। विकितां गोरस म्हणे घ्या हरी ॥ १ ॥ देखिला डोळां बैसला मनीं। तोचि वदनीं उच्चारी ॥ २ ॥ आपुलियाचा विसर भोळा। गोविंद कळा कौतुकें ॥ ३ ॥ तुका ह्मणे हांसे जन। नाहीं कान ते ठायीं ॥ ४ ॥

॥ ६९१० ॥ कान्हो एकली रे एकली रे। तुजसवें चुकलें रे ॥ भय वाटे वनीं मज अबळा धाकली रे ॥१॥ निघतां घरीं आई वा वारी। तुजसवें कां आलियें हरी ॥ २ ॥ लोक वाटा सांगती खोटा। परी मी चटा लागलियें ॥ ३ ॥ पिकल्या बोरी झालें सामोरी। काय जाणें कोठें राहिला हरी ॥ ४ ॥ आड खुंट झालिया जाळी। काय जाणों कान्हें मांडिली रळी ॥ ५ ॥ तुका ह्मणे जाऊं आलिया वाटा। पाहों हरी पायीं न मोडे कांटा ॥ ६ ॥

॥ ६९११ ॥ क्याला मज आयो वारितेसी घरा। खेळतों सोकरा नंदाचा मी ॥ १ ॥ बहु दिसीं झाली यासीं मज भेटी। आतां वाटे तुटी न परावी ॥ २ ॥ कोवळें बोलतो मना आवरतें। डोळियाचें पातें ढापवेना ॥ ३ ॥ आजी सकळांसीं आलें चोळूनियां। कां गो पाटी वांयां पुळाविली ॥ ४ ॥

तुमचें तें काय खोळंबलें काज । बल्या कां गो मज कोंडा घरीं ॥ ५ ॥ तुकयाचा धनी गोकुळनायक । सरा कांहीं एक बोलतों मी ॥ ६ ॥

॥ ६९१२ ॥ आतां न यें मागें । मी आलें याच्या रागें ॥ काय माझें जगें । कोपोनियां करावें ॥ १ ॥ कां गो कलिसां कोल्हाल । तुह्मी भलत्या च सकल ॥ वेचाल ते बोल । झुटे होतीं बोलिले ॥ २ ॥ याचे भेटी माझें मन । स्वरूपीं ठाकले लोचन ॥ वेगळें तें क्षण आतां होऊं नावरे ॥ ३ ॥ काज काम नको झालें । बीजें नावरे बोलिलें ॥ याचिया भेदिलें । कामबाणीं अंतर ॥ ४ ॥ या वेगळें होणें । आतां जळो तैसें जिणें ॥ घेतलें तें मनें । आतां मानें न फिरे ॥ ५ ॥ आतां मोटी वार । माझी नका धरूं चार ॥ तुकयाचा दातार । शेजे तो मी सुतलों ॥ ६ ॥

॥ ६९१३ ॥ हरिरता चपळा नारी । लागवरी न रिघती ॥ १ ॥ अवघ्या अंगें सर्वोत्तम । भोगी काम भोगता ॥ २ ॥ वाचा वाच्यत्वासी न ये । कोठें काय करावें ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा ऐशा । देवपिशा उदारा ॥ ४ ॥

॥ ६९१४ ॥ गौळणी आल्या वाज । म्हणती या गे राखों आज ॥ सांपडवूनी माज । घरांत धरूनी कोंडूं ॥ उघडें कवाड उभ्या काळोशाचे आड । साता पांचा एक भीड मौनेंची ठेल्या ॥ १ ॥ नित्य सोंकवला नेदी सांगों चित्त बोला ॥ आतां सांपडतां याला कोण सोडी जीवें ॥ २ ॥ जाणोनियां हरी साच घरा आला चोरी । गडियां ठेवूनी बाहेरी पूर्वद्वारें शिरे ॥ सांच्या भयाभीत चाले पिलंगत भोंवतालें । पाहे तंव देखियलें नवनीत पुढें ॥ ३ ॥ उतरोनी सिंकें । पाहे चाखोनियां निकें ॥ गोड तेंचि एका एकें । हातीं लांबवितो ॥ जाणे राखती तयांसीं । तेथें अधिकचि नासी ॥ माग लावीं हात पुसी । चोरी जाणावया ॥ ४ ॥ जाणोनियां नारी । मूळ वर्मद्वार धरी ॥ मग कोंडूनी भीतरी । घरांत धरियेला ॥ कां रे नागविसी । माझे मुलीं लागलासी ॥ आणवीन तुजपासीं । मागें खादलें तें ॥ ५ ॥ दोहीं संधी बाहे । धरूनी नेती माते पाहे ॥ काय नांसी केली आहे । घरामाजी येणें ॥ तुका म्हणे मुख । त्याचें वाढों नेदी दुःख ॥ दसवंती कवतुक । करूनी रंजविल्या ॥ ६ ॥

# डाका अभंग.

॥ ६९१५ ॥ चौक भरियेला आसनीं पाचारिली कुळस्वामिनी । वैकुंठवासिनी ये धांवोनी झडकरी ॥ १ ॥ रंगा येईं वो विठाई सांवळिये डोळसे तुझें श्रीमुख साजिरें तें मी केधवां देखेन ॥ २ ॥ रजतमधुपारती । पंचप्राणांची आरती ॥ अवघी सारोनी आइती । ये धांवती झडकरी ॥ ३ ॥ मन मारोनियां मेंढा । आशा मनसा तृष्णा तुटी ॥ भक्तिभाव नैवेद्य ताटीं । भरोनी केला हाकारा ॥ ४ ॥ डांका अनुहात गजरे । येउनी अंगासी संचरे ॥ आपुला घेउनी पुरस्कार । आरोग्य करीं तुकयासी ॥ ५ ॥

॥ ६९१६ ॥ साच माझा देव्हारा । भाक ठेवा भाव खरा । त्रिगुणांच फुलवरा । आणा विनति सांगतों ॥ १ ॥ माझें दैवत हें रंगीं । नाचे वैष्णवांच्या संगीं ॥ भरलें मग अंगीं । निवाड करी दोहींचा ॥ २ ॥ तुझें आहे तुजपासीं । परि तूं जागा चुकलासी ॥ चिवड्डोनियां नासी । तुझ्या घरिच्यांनीं केली ॥ ३ ॥ आतां न पडे ठावें । वांचूनियां माझ्या देवें । अंधकार व्हावें । नासु ठाव शोधावा ॥ ४ ॥ आंधळ्यासी डोळे । देते पांगुळासी पाय ॥ वांजा पुत्र फळे । नवस पुरविते विठाई ॥ ५ ॥ उगविलीं कोडीं मागें कितेकांचीं बापुडीं ॥ तुका म्हणे घडी । न लगे नवस द्या आधीं ॥ ६ ॥

॥ ६९१७ ॥ विनति घातली अवधारीं । मज देईं वो अभय करीं ॥ पीडिलों खेचरीं । आणीक वारी नांवांची ॥ १ ॥ रंगा येईं वो एकला रंग वोडवला । हरिनाम उठिला गजर केला हाकारा ॥ २ ॥ देवांचे दैवते । तुज नमिलें आदिनाथें ॥ ये वो कृपावंते । भोगा माझ्या धांवत ॥ ३ ॥ न लवीं आतां वेळ । आइत सारिली सकळ ॥ तुका म्हणे कुळ । आमुचिये दैवते ॥ ४ ॥

॥ ६९१८ ॥ माझा देव्हारा साचा । नाहीं आणीक कोणाचा ॥ त्रिभुवनीं याचा । ठसा न लगे पुसावें ॥ १ ॥ या रे लोटांगणीं । कांहीं करा विनवणी ॥ करील झाडणी । भूत काढी संसार ॥ २ ॥ पडिले विषयांचे गोंधळीं । ते त्रिगुण आकळी ॥ हरिनाम आरोळी । कानीं पडतां ते उठी ॥ ३ ॥ घेतला अहंकारें । काम क्रोधें या मत्सर ॥ पळती प्रेमभरें । अवघे ठाव सांडूनी

॥ ४ ॥ घेतलासे पुरा । माया ममता आसरा ॥ अवघ्या एक सरा । पळती रंग देखोनी ॥ ५ ॥ तुका म्हणे द्यावा भाव । फिटेल मनींचा संदेह ॥ आ-णीक न लगे ठाव । कांहीं कोठें हिंडावें ॥ ६ ॥

॥ ६९१९ ॥ पुढें येते देवी । तिची जती चालों द्यावी ॥ मागील झा-डावी । झाडा मान आसडी ॥ १ ॥ एकवीरा आली अंगा । आतां निवारी-ल रोगा ॥ माझ्या भक्तापाशीं सांगा । पूजा भावें करावी ॥ २ ॥ मेंढा मारावा लोवाळ । पूजा पावली सकळ ॥ तुम्ही केलें बळ । मग मी ठायीं न पडें ॥ ३ ॥ तुका म्हणे मुळीं । लागली ते आली कुळीं ॥ वंदूनी सकळीं ॥ जीवें भावें ओवाळा ॥ ४ ॥

॥ ६९२० ॥ अवघ्या ज्येष्ठा देवी कोण पूजनाचा ठाव । धरितांचि भाव कोठें नाहींसें झालें ॥ १ ॥ दिसे सारिखें सारिखें । परि तें कारणीं पारिखें ॥ तळीं गेलें देखें । वरी टोले न साहाती ॥ २ ॥ पट एका शिरीं यथाविधीनें त्या येरी ॥ वसकोळच्या घागरी । डेरे रांझण गाडगीं ॥ ३ ॥ तुका म्हणे माना । येथें कोणी रुसावें ना ॥ आपुलाल्या स्थानां । जेथें त्याचि शोभल्या ॥ ४ ॥

॥ ६९२१ ॥ खेचर खडतर । काळ कांपती असुर ॥ नांदे भीमातीर । पंढरपुरपाटणीं ॥ १ ॥ आतां करी कां रे हाकारा । सहस्रनामें एकसरा ॥ दवडिते खेचरा । अंगसंगें धरूनी ॥ २ ॥ सीते झाली झडपणी । राहाणें वासुगीच्या वनीं । पावली जननी । झोंटि मोकळिया केशी ॥ ३ ॥ लाविलें कावरें । प्रल्हादा ह्मैसासुरें ॥ आली येकसरें । दांत खात रंगासी ॥ ४ ॥ वसुदे-वाचीं बाळें । सात खादलीं ज्या काळें । आली भोगवेळे । तया कारणें तेथें ॥ ५ ॥ पांडवें बापुडीं । वाज केलीं फिरती वेडीं ॥ धांवोनियां काढी । अंगसंगें वाहाविलीं ॥ ६ ॥ नामाचें चिंतन । तेथें धांवते आपण ॥ न विचारितां हीण भाव देखे जयाचा ॥ ७ ॥ कुळींची कुळदेवता । तुका ह्मणे आह्मां माता । काय भय भूतां । काळ यमदूताचें ॥ ८ ॥

॥ ६९२२ ॥ देवीदेव झाला भोग सरला यावरी । सांगाया दुसरी ऐसी नाहीं उरली ॥ १ ॥ हरिनाम देवनाम तुह्मी गाऊनियां जागा । पेंठवणी मा-गा नका ठेवूं लिगाड ॥ २ ॥ शेवटीं सुताळी बरवी वाजवावी डांक । ताळा घाली एक सरलियाचे शेवटीं ॥ ३ ॥ गुंडाळा देव्हारा मान देती मानकरी । तुका ह्मणे बरीं आजी कोडीं उगविलीं ॥ ४ ॥

॥ ६९२३ ॥ झाली झडपणी खडतर देवता । संचरली आतां निघों नये ॥ १ ॥ मज उपचार झणी आतां करा । न साहे दुसरा भार कांहीं ॥ २ ॥ नेऊनियां घाला चंद्रभागे तिरीं । जीवा नाहीं उरी कांहीं आतां ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळों आलें वर्तमान । माझें तों वचन आच्छादलें ॥ ४ ॥

॥ ६९२४ ॥ अंगीं देवी खेळे । कां रे तुह्मांसी न कळे ॥ कोणाचे हे चाळे । सुख दुःख न मनितां ॥ १ ॥ मी तों आतां येथें नाहीं । ओळखी वचनाच्या ठायीं ॥ पालटाचा येई । भाव खरें लोपे ना ॥ २ ॥ आपुलाले तुह्मी पुसा । सोवा एव्याच सरिसा ॥ स्थिरावल्या कैसा । काय जाणों विचार ॥ ३ ॥ तुका ह्मणे लाभकाळ । तेथें नसावें शीतळ ॥ मग तैशी वेळ । कोठें जाते सांपडों ॥ ४ ॥

---

## आंधळा, पांगुळ.

॥ ६९२५ ॥ पांगुळ झालों देवा नाहीं हात ना पाय । बैसलों जयावरी सैराट तें जाय ॥ खेटितां कुंप कांटी । खुंट दरडी न पाहे ॥ आधार नाहीं मज कोणी । बाप ना माये ॥ १ ॥ दाते हो दान करा । जातें पंढरपुरा ॥ न्या मज तेथवरी । अखमाचा सोयरा ॥ २ ॥ हिंडतां गव्हानें गा । शिणलों दारोदारीं ॥ न मिळेची दाता कोणी । जन्मदुःखातें वारी ॥ कीर्ति हे संतां मुखीं । तोचि दाखवा हरी ॥ पांगळां पाय देतो । नांदे पंढरपुरीं ॥ ३ ॥ या पोटाकारणें गा । झालों पांगिला जना ॥ न सरेचि बापमाय । नाहीं भीक खंडणा ॥ पुढारा ह्मणती एक । तया नाहीं करुणा ॥ श्वान हें लागे पाठी । आशा बहु दारुणा ॥ ४ ॥ काय मी चुकलों गा । मागें नेणवे कांहीं ॥ न कळेचि पाप पुण्य । तेथें आठव नाहीं ॥ मी माजी भुललों गा । दीप पतंगा सोयी ॥ द्या मज जीवदान । संत महानुभाव कांहीं ॥ ५ ॥ दुरोनी आलों मी गा । दुःख झालें दारुण ॥ यावया येथवरी । होतें हेंचि कारण ॥ दुर्लभ भेटी तुम्हां । पायीं झालें दरुषन ॥ विनवितो तुका संतां । दोन्ही कर जोडून ॥ ६ ॥

॥ ६९२६ ॥ देश वेष नव्हे माझा । सहज फिरत आलों ॥ करूं सत्ता कवणावरी । कोठें स्थिर राहिलों ॥ पायडोळे म्हणतां माझे । तिहीं कैसा मोकलिलों ॥ परदेशी नाहीं कोणी । अंध पांगुळ झालों ॥ १ ॥ आतां माझी

करीं चिंता । दान देईं भगवंता ॥ पाठीं पोटीं नाहीं कोणी । निरवीं सज्जन संता ॥ २ ॥ चालतां वाट पुढें । भय वाटतें चित्तीं ॥ बहुत जणें गेलीं । नाहीं आलीं मागुतीं ॥ न देखें काय झालें । कान तरी ऐकती ॥ बैसलों संधिभागीं । तुज धरूनी चित्तीं ॥ ३ ॥ भाकितों करुणा गा । जैसा सांडिला ठाव ॥ न भरे पोट कधीं । नाहीं निश्चळ पाव ॥ हिंडतां भागलों गा । लक्ष चौऱ्याशीं गांव ॥ धरूनी राहिलों गा । हाचि वसता ठाव ॥ ४ ॥ भरंवसा काय आतां । कोण आणि अवचिता ॥ तैसीच झाली कीर्ति । तया मज बहुतां ॥ म्हणऊनीं मारीं हाका । सोयी पावें पुण्यवंता ॥ लागली भूक थोरी । तूंचि कृपाळू दाता ॥ ५ ॥ संचित सांडवलें । कांहीं होतें जवळी ॥ वित्त गोत पुत माया । तुटली हे लागावळी ॥ निष्काम झालों देवा । होतें माझें कपाळीं ॥ तुका म्हणे तूंचि आतां । माझा सर्वस्वें बळी ॥ ६ ॥

॥ ६९२७ ॥ देखत होतों आधीं मागें पुढें सकळ । मग हे दृष्टि गेली व आलें पडळ ॥ तिमिर कोंदलेंसें वाढे वाढतां प्रबळ । भीत मी झालों देवा । काय ज्यालयाचें फळ ॥ १ ॥ आतां मज दृष्टि देईं । पांडुरंगा मायबापा ॥ शरण आलों आतां । निवारूनियां पापा ॥ अंजन लेववूनी । करीं मारग सोपा ॥ जाईन सिद्धपंथें । अवघ्या चुकती खेपा ॥ २ ॥ होतसे खेद चित्ता । कांहीं नाठवे विचार ॥ जात होतों जना मागें । तोही सांडिला आधार ॥ हा ना तोसा ठाव झाला । अवघा पडिला अंधार ॥ फिरलीं माझीं मज । कोणी न देती आधार ॥ ३ ॥ जोंवरी चळण गा । तोंवरी म्हणती माझा ॥ मानिती लहान थोर । देहसुखाच्या काजा ॥ इंद्रियें मावळलीं । आला बागुल आजा ॥ कैसा विपरीत झाला । तोचि देह नव्हे दुजा ॥ ४ ॥ गुंतलों या संसारें । कैसा झालोंसें अंध ॥ मी माझें वाढवूनी । मायातृष्णेचा बाध ॥ स्वहित न दिसेचि । केला आपुला वध ॥ लागले काळ पाठीं । सवें काम हे क्रोध ॥ ५ ॥ लागती चालतां गा । गुणदोषाच्या ठेसा ॥ सांडिली वाट मग । झालों निराळा कैसा ॥ पाहातों वास तुझी । थोर करूनी आशा ॥ तुका म्हणे वैद्यराजा । पंढरीच्या निवासा ॥ ६ ॥

॥ ६९२८ ॥ सहज मी आंधळा गा निजनिराकारा पंथें । वृत्ति हे निवृत्ति झाली जन न दिसे तेथें ॥ मी माझें हारपलें ठायीं जेथींच्या तेथें । अदृश्य तेंचि झालें कांहीं दृश्य जें होतें ॥ १ ॥ सुखी मी निजलों गा शून्य सारूनी तेथें । त्रिकूटशिखरीं गा दान मिळे आइतें ॥ २ ॥ टाकिली पात्र झोळी धर्म

अधर्म आशा । कोल्हाळ चुकविला त्रिगुणांचा बोळसा ॥ न मागें मी भीक आतां हाचि झाला भरंवसा । बोळली सत्रावी गा तिणें पुरविली इच्छा ॥ ३ ॥ ऊर्ध्वमुखें आळविला सोहं शब्दाचा नाद । अरूप जागविला दाता घेऊनी छंद ॥ घेऊनी आला दान निजतत्व निजबोध । स्वरूपीं मेळविलें नांव ठेविला भेद ॥ ४ ॥ शब्द हा बहुसार उपकाराची राशी । म्हणोनि चालविला मार्गें येतील सांसी ॥ मागोनी आली वाट सिद्धओळीची तैसी। तरले तरले गा आणीक ही विश्वासी ॥ ५ ॥ वर्म तें एक आहे दृढ धरावा भाव । जाणीवनागवण नेदी लागो ठाव ॥ म्हणोनि संग टाकीं सेवीं अद्वैत भाव । तुका म्हणे हाचि संतीं मार्गें केला उपाव ॥ ६ ॥

॥ ६९२९ ॥ आंधळ्यापांगळ्यांचा एक विठोबा दाता । प्रसवला विश्व तोचि सर्व होय जाणता ॥ घडी मोडी हेळामात्रें पापपुण्यसंचिता। भवदुःख कोण वारी तुजवांचुनि चिंता ॥ १ ॥ धर्म गा जागो तुझा तूंचि कृपाळू राजा । जाणसी जीवींचें गा न सांगतां सहजा ॥ २ ॥ घातली लोळणी गा पुंडलीकें वाळवंटीं । पंढरी पुण्य ठाव नीरे भीवरे तटीं ॥ न देखे दुसरें गा झाली अदृश्यदृष्टि । बोळला प्रेमदाता केली अमृतदृष्टि ॥ ३ ॥ आणीक उपमन्यु एक बाळ धाकुटें । न देखे न चलवे जना चालते वाटे ॥ घातली लोळणी गा हरिनाम बोभाटे । पावला साकारणें धांव घातली नेटें ॥ ४ ॥ बैसोनी खोळी शुक राहे गर्भ आंधळा । शीणला येरझारी दुःख आठवी वेळा ॥ मागील सोसिलें तें ना भीं म्हणे गोपाळा । पावला साकारणें लाज राखिली कळा ॥ ५ ॥ न देखे जो या जना तया दावी आपणा । वेगळा सुखदुःखा मोहो सांडवी धना ॥ आपपर तेंही नाहीं बंधुवर्ग सज्जना। तुकया तेचि परी झाली पावें नारायणा ॥ ६ ॥

॥ ६९३० ॥ भगवंता तुजकारणें मेलों जीताचि कैसी । निष्काम बुद्धि ठेली चळण नाहीं तयासी ॥ न चलती हात पाय दृष्टि फिरली कैसी । जाणतां न देखों गा क्षर आणि अक्षरासी ॥ १ ॥ विठोबा दान दे गा तुझ्या सारिखें नामा । कीर्ति हे वाखाणिली थोर वाढली सीमा ॥ २ ॥ भुक्ति मुक्ति तूंचि एक होसि सिद्धीचा दाता । म्हणोनि सांडवली शोक भय लज्जा चिंता ॥ सर्वस्वें त्याग केला धांव घातली आतां । कृपादान देईं देवा येऊनि सामोरा आतां ॥ ३ ॥ संसारसागरु गा भवदुःखाचें मूळ । जनवाद अंथरुण माजी केले इंगळ ॥ इंद्रियें वज्रघातें तपे उष्ण वरी जाळ । सोसिल काय

करूं दुर्भर हे चांडाळ ॥ ४ ॥ तिहीं लोकीं तुझें नाम वृक्ष पल्लव शाखा । वेंघलो वारि खोडा भाव धरूनी टेंका ॥ जाणवी नरनारी जागो धरम लोकां । पावती पुण्यवंत सोई आमुचिये हाका ॥ ५ ॥ नाठवे आपपर आतां काय बा करूं । सारिखा सोइसवा हारपला विचारू ॥ घातला योगक्षेम तुज आपुला भारु । तुकया शरणागता देई अभयकरूं ॥ ६ ॥

## वासुदेव अभंग.

॥ ६९३१ ॥ राम राम दोनी अक्षरें । सुलभ आणि सोपारें ॥ जागा मागिले पाहारें । सेवटिचें गोड तेंचि खरें गा ॥ १ ॥ रामकृष्ण वासुदेवा । जाणवी जनासी ॥ वाजवी चिपळिया । टाळ घागऱ्याघोषें गा ॥ २ ॥ गाय वासुदेव वासुदेवा । भिन्न नाहीं आणिका नांवा ॥ दान जाणोनियां करीं आवा । न ठेवीं उरीं कांहीं ठेवा गा ॥३॥ एक वेळा जाणविती । धरूनियां राहा चित्तीं ॥ नेघे भार सांडीं कामा हातीं । नीज घेऊनी फिरती गा ॥ ४ ॥ सुपात्रीं सर्व भाव । मी तो सर्व वासुदेव ॥ जाणती कृपाळू संत महानुभाव । जया भिन्न भेद नाहीं ठाव गा ॥ ५ ॥ शूर दान जीवें उदार । नाहीं वासुदेवीं विसर ॥ कीर्ति वाढे चराचर । तुका म्हणे तया नमस्कार गा ॥ ६ ॥

॥ ६९३२ ॥ बोल बोले अबोलणें । जागें बाहेर आंत निजेलें ॥ कैसें घरांत घरकुल केलें । नेणो अंधार ना उजेडलें गा ॥ १ ॥ वासुदेव करितों फेरा । वाडियांत बाहेर दारा ॥ कोणी कांहीं तरी दान करा । जाब नेदा तरी जातो माघारा गा ॥ २ ॥ हातीं टाळ दिंडी मुखीं गाणें । गजर होतो बहु मोठ्यानें ॥ नाहीं निवडिलीं थोर लहानें । नका निजों भिकेच्या भेणें गा ॥ ३ ॥ मी वासुदेव तत्वता । कळों येईल विचारितां ॥ आहे ठाऊका सभाग्या संता । नाहीं दुजा आणीक मागता गा ॥ ४ ॥ काय जागाचि निजलासी । सुनें जागवूनि दारापासीं ॥ तुझ्या हितापाठीं करी व्यास व्यासी भेटी न घेसी वासुदेवासी गा ॥ ५ ॥ ऐसें जागविलें अवघें जन । होतें संचित तिहीं केलें दान ॥ तुका म्हणे दुबळीं कोण कोण । गेलीं वासुदेवा विसरून गा ॥ ६ ॥

॥ ६९३३ ॥ रामकृष्ण गीती गात । टाळ चिपळ्या वाजवीत ॥ छंदें आपुलिया नाचत । नीज घेऊनी फिरत गा ॥ १ ॥ जनीं वनीं हा अवघा

देव । वासनेचा हा पुसावा ठाव ॥ मग बोळगती वासुदेव । ऐसा मनीं वसुं द्यावा भाव गा ॥ २ ॥ निज दासाची थोर आवडी । वासुदेवासी लागली गोडी । मुखीं नाम उच्चारी घडोघडी । ऐसी करा हे वासुदेवजोडी गा ॥ ३ ॥ अवघा सारूनी सेवट झाला । प्रयत्न न चले कांहीं केला ॥ जागा होई सांडुनि झोपेला । दान देई वासुदेवाला गा ॥ ४ ॥ तुका ह्मणे रे धन्य त्याचें जिणें । जिहीं घातलें वासुदेवा दान । त्याला नलगे येणें जाणें। झाले वासुदेवीं राहणें गा ॥ ५ ॥

॥ ६९३४ ॥ यासी भांडावें तें तोंडें ॥ पुरे अंतरींचें कोडें ॥ १ ॥ ऐसा घरींचा या भोळा ॥ जनां निकटा जवळा ॥ २ ॥ हाका मारितांचि द्वारीं ॥ यावें धांवोनी बाहेरी ॥ ३ ॥ तुका म्हणे वासुदेवें ॥ मागितलें हातीं द्यावें ॥ ४ ॥

## गांवगुंड. अभंग.

॥ ६९३५ ॥ आह्मीं झालों गांवगुंड । अवघ्या पुंड भूतांसी ॥ १ ॥ दुसरें तें खेळों आलें । एका बोलें तो मिर्या ॥ २ ॥ अवघियांचा येऊं लाग । नेदूं अंग शिवाया ॥ ३ ॥ तुका म्हणे खुंटूं नाद । जिंतूं वाद सर्तीनें ॥ ४ ॥

## जोगी. अभंग.

॥ ६९३६ ॥ जग जोगी जग जोगी । जग जागे बोलती ॥ १ ॥ जागता जगदेव । राखा कांहीं भाव ॥ २ ॥ अवघा क्षत्रपाळे । पूजा सकळ ॥ ३ ॥ पूजापत्र कांहीं । फळपुष्प तोय ॥ ४ ॥ बहुतां दिसां फेरा । आला या नगरा ॥ ५ ॥ नका घेऊं भार । धर्म तोचि सार ॥ ६ ॥ तुका मागे दान । द्या जी अनन्य ॥ ७ ॥

## गोंधळी. अभंग

॥ ६९३७ ॥ आह्मी गोंधळी गोंधळी । गोविंद गोपाळाच्या मेळीं ॥ १ ॥ आमुचा घालावा गोंधळ । वाजवूं हरि नामीं संभळ ॥ २ ॥ दहा

पांचां घाला जेवूं । आह्मी गोंधळाला येऊं ॥ ३ ॥ कामक्रोध बकरे मारा । पुजा रखमादेवीवरा ॥ ४ ॥ जेथें विठोबाचें देऊळ । तेथें तुकयाचा गोंधळ ॥ ५ ॥

## जैन. अभंग.

॥ ६९३८ ॥ लंचूनियां केश जति होती सायास । पूजिती पारशनाथ देव ॥ १ ॥ हो कोण अवतार नकळे तयांसीं ॥ सांडूनी हरिसीं भ्रमताती ॥ २ ॥ तुका म्हणे धर्म सोडिला विचार । केवीं येरझार चुके बापा ॥ ३ ॥

## फकीर. अभंग.

॥ ६९३९ ॥ येइल घरा देव न धरीं संदेहा । फकिराचा यावा व्हावा जेव्हां ॥ १ ॥ होइल फकिर योगी महानुभाव । घडीघडी देव सांभाळील ॥ २ ॥ तुका म्हणे ऐसें बोलती बहुत । येणें गुणें संत झाले राम ॥३॥

## सरवदा. अभंग.

॥ ६९४० ॥ ऐका गा ए भाई । सरवदा सांगतो काई । येथें नाडेल माई । दोघां पुत्रांची ॥ ते करिती तिची विटंबना । अवघ्या प्रसिद्ध जना । एक न मारितां शाहाणा । तो जाणा सुख न पवे ॥ १ ॥ आणीक ऐका गा ए । सरवदा सांगतो काय । खरेंचि बोले तो जाय । नरकामध्यें अधोगती ॥ हें चौघांच्या मुखें । मना आणावें सुखें । अवघीं चुकती दुःखें । खोटें बोला नरनारी ॥ २ ॥ आणीक नाडेल एक जाण । सरवदा बोलतो वचन । जागें माझें चित्त म्हणोन । पडिलें खान तया घरीं ॥ ह्मणोन न ह्मणा माझें कांहीं । निजीं निजा सुखें ठायीं । यत्न होईल तई । चोराठायीं विश्वास ॥ ३ ॥ आणीक एकी परी । सरवदा सांगतो थोरी । दुःख पावेल नारी । पतिव्रता यामधीं ॥ पांचांनीं दिधली हातीं । ह्मणोनि न मनावी निश्चिती । परपुरुषीहोय रती । सुखगती ते पावे ॥ ४ ॥ आणीक एकी परी । सरवदा सांगतो तें करीं दान देतां जो न वारी । नव्हे भला भला तो ॥ तुका म्हणे आई । येथें नांव काई । सांगसी तें ठायीं । मरो रांडेचें ॥ ५ ॥

## मुंढा. अभंग.

॥ ६९४१ ॥ संबाल यारा उपर तलें दोन्हो मारकी चोट । नजर करे सो ही-राखे पश्वा जावे लुट ॥ १ ॥ प्यार खुदाई रे बाबा । जिकिर खुदाई ॥ २ ॥ उडे कुदे ढुंग नचावे आगल भुलन प्यार । लडबड खडबड कांहेकां खचलवत भार ॥ ३ ॥ कहे तुका चलो एका हम जिन्हों के सात । मिलावे तो उसे देना तोंही चढावे हात ॥ ४ ॥

॥ ६९४२ ॥ सब संबाल भ्याने लौंढें खडा केऊं गुंग । मदिरथी मता हुवा भुलि पाडी भंग ॥ १ ॥ आपसकुं संबाल आपसकुं संबाल । मुंढे खुब राख ताल । मुथिवोहि बोला नहीं तो करूंगा हाल ॥ २ ॥ आवलका तो पीछे नहीं मुदल विसर जाय । फिरते नहीं लाज रंडी गधे गोते खाय ॥ ३ ॥ जिन्हो खातिर इतना होता सो नहीं तुझे बेफाम । उचा जोरो लिया तुंबा तुंबा बुरा काम ॥ ४ ॥ निकल जावे चिकल जोरो मुंढे दिलदारी । जबानीकी छोड दे बात फिर एक तारी ॥ ५ ॥ कहे तुका फिसल रुका मेरेको दान देख । पकड धका गांडगुढघी मार चलाऊं आलेख ॥ ६ ॥

॥ ६९४३ ॥ आवल नाम आल्ला बडा लेते भुल न जाये । इलाम साकालजमुपरताही तुंब बजाये ॥ १ ॥ आल्ला एक तुं नबी एक तुं ॥ २ ॥ काटतें सिर पावों हात नहीं जीव उराये । आगले देखे पिछले बुझे । आपें हजुर आयें ॥ ३ ॥ सब सबरी बचाव भ्याने । खडा आपनी सात ॥ हात पावों रखते जबाव । नहीं आगली बात ॥ ४ ॥ सुनो भाई बजार नहीं । सबहि निरचे लाव । नन्हा बडा नहीं कोये एक ठोर मिलाव ॥ ५ ॥ एक तार नहीं प्यार । जीवतनकी आस ॥ कहे तुका सो हि मुंढा । राखलिये पायेनपास ॥ ६ ॥

## भराड. अभंग.

॥ ६९४४ ॥ हातीं डउर निज बोधाचा । ज्ञान त्रिशूळ वैराग्याचा ॥ शांतिविभुतीचें लेपन । बरवें दावी सुदर्शन ॥ १ ॥ सोम सोनारीच्या देवा कानीं विभुतीच्या मुद्रा । भाळीं शोभे अर्ध चंद्रा ॥ माथां केउराचा भार । निजवृत्ती निर्विकार ॥ २ ॥ काखे ब्रह्मांडाची झोळी । पृथ्वीपात्र

करतळीं ॥ अष्ट भैरवांचा राव । देह आत्मा सदाशिव ॥ ३ ॥ जेथें भाव देखे मनीं । तेथें करी पुंगी ध्वनी ॥ पुंगी महावाक्य जाणा । सावध करी योगीजना ॥ ४ ॥ कोणी करा दान पुण्य । उभें केलें कां अज्ञुन ॥ नका भार घेऊं माथा । भावार्थ अर्पावा भगवंता ॥ ५ ॥ बहेना विवेक सांगे लोकां । सद्गुरु ह्मणे माझा तुका । आतां येणें जाणें ना देहे । आत्मा अखंड सुख भोगी हे ॥ ६ ॥

## डोई फोडा. अभंग.

॥ ६९४५ ॥ तम भज्याय ते वुरा जिकीर ते करे । सीर काटे ऊर कुष्टे ताहां सब डरे ॥ १ ॥ ताहां एक तु ही ताहां एक तु ही । ताहां एक तुही रे बाबा हमें तुह्मे नहीं ॥ २ ॥ दिदार देखो भुले नहीं किशे पछाने कोये । सचा नहीं पकडुं सके झुटा झुटे रोये ॥ ३ ॥ किसे कहे मेरा किन्हे सात लिया भास । नहीं मेलो मिले जीवना झुटा किया नास ॥ ४ ॥ सुनो भाई कैसा तो ही । होय तैसा होय ॥ बाट खाना कहना एकबारां तो ही ॥ ५ ॥ भला लिया भेक मुंढे । आपना नफा देख ॥ कहे तुका सो ही संका । हाक अल्ला एक ॥ ६ ॥

## मलंग. अभंग.

॥ ६९४६ ॥ नजर करे सो हि जिके बाबा दुरथी तमासा देख । लकडी फांसा लेकर बैठा आगले ठकण भेख ॥ १ ॥ काहे भुला एक देखतां आंखो मार तडांगो बाजार ॥ २ ॥ दमरी चमरी जो नर भुला । सोत आघो हि लत खाये ॥ ३ ॥ नहि बुलावत किसे बाबा आप हि मत जाये । कहे तुका उस असाके संग फिराफिर गोते खाये ॥ ४ ॥

## गाई. अभंग.

॥ ६९४७ ॥ आम्हां घरीं एक गाय दुभताहे । पान्हा न समाये त्रिभुवनीं ॥ १ ॥ वान ते सांवळी नांव तें श्रीधरा । चरे वसुंधरा चौदा भुवनें

॥ २ ॥ वत्स नाहीं माय भलत्या सर्वं जाय । कुर्वाळी तो लाहे भावभरण
॥ ३ ॥ चहूं धारीं क्षीर वोळली अमुप । धाले सनकादिक सिद्ध मुनी
॥ ४ ॥ तुका ह्मणे माझी भूक तेथें काय । जोगाविते माय तिन्ही लोकां ॥ ४ ॥

## दिंडीगाणें. अभंग.

॥ ६९४८ ॥ प्रथम नमूं गणराजा । भावें नमूं गुरु माझा ॥ संत साधु आदि पूजा । मुळींहुनीं आधार मज तुझा ॥ १ ॥ हातीं टाळ घेउनी दिंडी । दोन भोंपळे श्रवण जोडी ॥ तंतु तुळशीचा लाविला गोडी । निरर्थक कर्म सांडी ॥ २ ॥ आकाशासी नाहीं कुळगोत्र । सांगा वायूचें कोण याती सूत्र ॥ तेज अग्नि व्यापक सर्वत्र । आकाशानें होय पवित्र ॥ ३ ॥ काय विघरलें हें पाणी । रवितेज उगवलें कोठोनी ॥ कैशीं भ्रमती तारांगणीं । चंद्रा अंधार फिरे कोठुनी ॥ ४ ॥ किती समुद्राचें पाणी । पर्जन्यधारा कैशा गगनीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे सद्गुरुचरणीं । मूळभेद कळे दिंडीगाणीं ॥ ६ ॥

## दरवेस. अभंग.

॥ ६९४९ ॥ अल्ला करे सो होय बाबा करतारका सिरताज । गाऊ बछरे तिस चलावे यारी बाघो न सात ॥ १ ॥ ख्याल मेरा साहेबका बाबा हुवा करतार । व्हांटें आघे चढे पीठ आपे हुवा असवार ॥ २ ॥ जिकिर करो अल्लाकी बाबा सबल्यां अंदर भेस । कहे तुका जो नर बुझे सोहि भया दरवेस ॥ ३ ॥

## वैद्यगोळी. अभंग.

॥ ६९५० ॥ अल्ला देवे अल्ला दिलावे अल्ला दारु अल्ला खिलावे । अल्ला बगर नहीं कोये अल्ला करे सोहि होये ॥ १ ॥ मर्द होये वो खडा फीर नामर्दकुं नहीं धीर । आपने दिलकुं करना खुसी तीन दामकी क्या खुमासी ॥ २ ॥ सब रसोंका किया मार । भजनगोली एक हि सार ॥ इमान तो सब ही सखा । थोडी तो भी लेकर ज्या ॥ ३ ॥ जिन्हो पास नीत सोये । वो हि बझकर तिरोवे ॥ सांतो पांचो मार चलावे । उतार सो पीछे खावे ॥ ४ ॥